महसूल विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील महसूल, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक तसेच जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख या सर्व उप विभागातील राजपत्रित अधिकाऱ्यांना प्रतिनियुक्तीने जाण्याकरीता अटी व शर्ती आणि नियुक्तीची कार्यपध्दती....
मार्गदर्शक सूचना

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन परिपत्रक क्र. प्रतिनि-२०२६/प्र.क्र.२७/ई-१६१८०९६/आस्था-१-अ**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
**दिनांक १३ एप्रिल, २०२६**

वाचा:- १) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.आरसीटी-१०/०८/२०१२/प्र.क्र.१०९/ई-१ दि.२२.११.२०१३
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/कार्यासन १२ दि.१७.१२.२०१६
३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.५१०/कार्या.१२ दि.१६.०२.२०१८

**प्रस्तावना:-**

सामान्य प्रशासन विभागाच्या उपरोक्त संदर्भ क्र. २ व ३ येथील शासन निर्णयान्वये शासनाने प्रतिनियुक्तीचे धोरण घोषित केले असून त्यानुसार राज्य शासनाच्या विविध विभाग/विभागाच्या अधिपत्याखालील मंडळे, महामंडळातील पदांवर तसेच निमशासकीय कार्यालय (नगर पालिका / महानगर पालिका), अन्य राज्य शासनाच्या वा केंद्र शासनाच्या अधिपत्याखालील कार्यालये / महामंडळे / कंपन्या इ. मधील पदे थेट नियुक्तीने न भरता राज्य शासनाच्या सेवेतील त्याच पदावर अथवा समकक्ष पदावरून प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येते. तथापि, महसूल विभागांतर्गत कार्यरत अधिकारी हे मोठ्या प्रमाणात प्रतिनियुक्तीने इतर विभाग / महामंडळे / निमशासकीय कार्यालये इ. मध्ये प्रतिनियुक्तीच्या पदावर वारंवार जात असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर अधिकारी प्रतिनियुक्तीने अन्य संवर्गात कार्यरत राहिल्याने मूळ महसूल उप विभागांतर्गत विविध संवर्गातील पदे रिक्त राहून त्याचा प्रत्यक्ष परिणाम सामान्य नागरिकांसाठी उपलब्ध असलेल्या सेवांवर होतो. तसेच, अशी पदे सामान्यत: वरिष्ठ संवर्गातील असल्याने नियमित कामकाज मोठ्या प्रमाणावर विस्कळीत होऊन त्याचा एकंदरीत परिणाम शासनाच्या कामकाजावर होतो.

विविध विभागांकडून प्राप्त होणाऱ्या मागण्यांचे अवलोकन केले असता, काही कार्यालयाकडून विशिष्ट अधिकाऱ्यांच्या नियुक्तीबाबत मागणी केली जात असल्याचे दिसून आले आहे. यामुळे काही अधिकारी वारंवार प्रतिनियुक्तीवर जातात. किंबहुना त्यांच्या सेवेचा बहुतांश कालावधी प्रतिनियुक्तीच्या पदावर व्यतीत होतो. त्यामुळे अन्य अधिकाऱ्यांना प्रतिनियुक्तीच्या पदावर कार्यरत राहण्याची संधी उपलब्ध होत नाही. काही अधिकारी दीर्घकाळ मूळ संवर्गाबाहेरील पदावर प्रतिनियुक्तीने कार्यरत असल्याने मूळ पदाचे कामकाज फार कमी कालावधीसाठी पार पाडत असल्याचे निदर्शनास आले आहे. प्रतिनियुक्तीच्या नेमणूकांमध्ये एकसूत्रता राहण्याच्या दृष्टीने सामान्य प्रशासन विभागामार्फत संदर्भाधीन क्र.२ व ३ येथील शासन निर्णयान्वये सर्व समावेश प्रतिनियुक्ती धोरण ठरविण्यात आले आहे. सदर प्रतिनियुक्ती धोरणाचे काटेकोरपणे पालन करणे व त्यात अधिक स्पष्टता येण्याच्या अनुषंगाने मार्गदर्शक निर्गमित करणे क्रमप्राप्त आहेत.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, महसूल विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील महसूल, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक तसेच जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख या सर्व उप विभागातील राजपत्रित अधिकाऱ्यांना अन्य विभागांतर्गत पदावर प्रतिनियुक्तीने जाण्याकरीता नियुक्त्यांमध्ये सुसूत्रता व प्रशासकीय शिस्त राहण्याच्या दृष्टीने सर्वसमावेशाक प्रतिनियुक्ती धोरणाच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे आवश्यक झाले आहे.

**शासन परिपत्रक :-**

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन क्र.२ व ३ च्या शासन निर्णयान्वये प्रतिनियुक्तीच्या धोरणात्मक बाबी तसेच उपरोक्त नमूद केलेल्या बाबींचा सर्व साकल्याने विचार करुन, महसूल विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील महसूल, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक तसेच जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख या सर्व उप विभागातील राजपत्रित अधिकाऱ्यांना प्रतिनियुक्तीने अन्य प्रशासकीय विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालयातील मंडळ / महामंडळ, निमशासकीय कार्यालय (नगर पालिका / महानगर पालिका), अन्य राज्य शासनाच्या वा केंद्र शासनाच्या अधिपत्याखालील कार्यालये / महामंडळे / कंपन्या इ. मधील पदांवर प्रतिनियुक्तीने नियुक्तीच्या संदर्भात पुढीलप्रमाणे सूचना विहित करण्यात येत आहे:-

**महसूल उपविभागातील अपर जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) / अपर जिल्हाधिकारी / उप जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) / उप जिल्हाधिकारी / तहसिलदार / नायब तहसिलदार तसेच नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक / जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख या उप विभागातील राजपत्रित अधिकारी :-**

१) उपरोक्त अधिकाऱ्यांना सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन क्र.२ व ३ च्या शासन निर्णयातील अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रथमत: ३ (तीन) वर्षांकरीता प्रतिनियुक्तीच्या पदावर कार्यरत राहता येईल.

२) तद्नंतर संबंधित अधिकाऱ्यांनी मूळ विभागात कमीत कमी ३ (तीन) वर्षे सेवा (cooling off) पूर्ण करणे आवश्यक राहील.

३) मूळ विभागात किमान ३ (तीन) वर्षे सेवा (cooling off) कालावधी पूर्ण केल्याशिवाय संबंधित अधिकाऱ्यांचा पुढील प्रतिनियुक्तीच्या पदासाठी विचार करण्यात येणार नाही.

४) अपर जिल्हाधिकारी (निवडश्रेणी), अपर जिल्हाधिकारी, उप जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) व उप जिल्हाधिकारी या संवर्गातील अधिकाऱ्यांना संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयातील परि.क्र.२ (३) मधील तरतूदीच्या मर्यादेत प्रतिनियुक्तीच्या पदावर नियुक्ती अनुज्ञेय राहील.

५) महसूल विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील महसूल, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक तसेच जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख या सर्व उप विभागातील राजपत्रित अधिकाऱ्यांना संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयातील परि.क्र.५ अ (१) च्या तरतूदीच्या मर्यादेत प्रतिनियुक्तीच्या पदावर नियुक्ती अनुज्ञेय राहील.

६) उपरोक्त तरतुदी प्रतिनियुक्तीच्या पदावर यापूर्वी काम केलेल्या अथवा सध्या कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांना लागू राहतील

७) अपवादात्मक परिस्थितीत प्रतिनियुक्तीच्या पदावर जास्तीत जास्त १ (एक) वर्षाची मुदतवाढ मुळ विभागाच्या मान्यतेनेचं अनुज्ञेय राहील.

८) मा.मुख्यमंत्री /मा.उपमुख्यमंत्री /मा.मंत्री / मा.राज्यमंत्री यांच्या आस्थापनेवर कार्यरत अधिकाऱ्यांचा प्रतिनियुक्तीने नियुक्तीचा कालावधी जास्तीत जास्त ५ (पाच) वर्षाचा राहील. त्यापेक्षा अधिक कालावधीच्या मुदतवाढीस मा.मुख्यमंत्री महोदयांची मान्यता अनिवार्य राहिल.

२. सदर प्रकरणी उपरोक्त मार्गदर्शक सूचनांबरोबरच सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन क्र.२ व ३ येथील शासन निर्णयान्वये प्रतिनियुक्तीने नियुक्तीच्या संदर्भात निर्गमित केलेल्या तरतूदी लागू राहतील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या या संकेतस्थळावर www.maharashtra.gov.in उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२६०४१३१०२९२४२९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MAHESH ASHOKRAO VARUDKAR

Digitally signed by MAHESH ASHOKRAO VARUDKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT,
2.5.4.20=D93C4961D98086877A4048296211D7AF97ECFD40D7967C43D20B360D83CE0FA6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7EBBBC3712E8D459EF90BF7AAE4EA46E9CAEBDD50CFECDE2EE7CE0454FA0416A, cn=MAHESH ASHOKRAO VARUDKAR
Date: 2026.04.13 10:30:17 +05'30'

**(महेश वरुडकर)**

**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव

२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव

३. मा. उपमुख्यमंत्री तथा मंत्री (नगर विकास/गृहनिर्माण) यांचे सचिव

४. मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क,क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ) यांचे सचिव

५. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव

६. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव

७. अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई

८. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग

९. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे

१०. विभागीय आयुक्त, (सर्व)

११. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे

१२. जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी (सर्व)

१३. अपर जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) (सर्व)

१४. अपर जिल्हाधिकारी (सर्व)

१५.उप जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) (सर्व)

१६.उप जिल्हाधिकारी (सर्व)

१७. तहसिलदार (सर्व)

१८. नायब तहसिलदार (सर्व)

१९. निवडनस्ती (आस्था-१-अ)